म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का. वा.
दा.क्र. ९२५४



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401254
BVBK-0401254

# कादंबरीकार हरि भाऊ

कांहींतरी नवेंच करा : ४

# कादंबरीकार हरिभाऊ

* *

र. गं. विद्वांस

* *

पन्नास नये पैसे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. 9254 दिनांक 20.5.69
क्रं.
विषय बा. वा.
BVBK-0401254

वो रा ॲ ण्ड कं प नी
पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउण्ड बिल्डिंग, मुंबई-२.



हरि नारायण आपटे हे आधुनिक मराठीचे आद्य कादंबरीकार. वाङ्मयीन प्रतिभा ही ईश्वरदत्त असते हें खरेंच; तथापि त्या प्रतिभेचा विलास समाजकल्याणाच्या दृष्टीनें झालेला दिसला तर ती खरीखुरी दैवी देणगी ठरते. हरिभाऊंच्या बाबतींत असेंच घडलेलें दिसेल. ––त्यांतहि सरकारी नोकरीचा त्याकाळीं रुळलेला राजमार्ग सोडून समाजसुधारणेसाठीं साहित्यनिर्मितीची नवी पाऊलवाट त्यांनीं पाडली, हें त्यांचें संस्मरणीय वैशिष्ट्य.–– ज्यांना मराठी भाषेचें साहित्यिक व्हावयाचें असेल त्यांना हरिभाऊंचें चरित्र आणि साहित्य अभ्यासल्यावांचून गत्यंतरच नाहीं.

★

श्री:१५१:२[८-६१]

*

© १९५९
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.–
करितां; ३, राउण्ड
बिल्डिंग, काळबादेवी,
मुंबई २.

*

आवृत्ति दुसरी
शके १८८३
सन १९६१

*

पन्नास नये पैसे

*

मुद्रक :
ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस,
२९४ सदाशिव, पुणें २.

९२५४ दि० २०।५।६७
बा०वा०

# कादंबरीकार हरिभाऊ

## मराठी कादंबरीची वाटचाल

मराठी वाङमयांत ललित साहित्याला आज एक विशिष्ट दर्जा प्राप्त झालेला आहे. कथा, कादंबऱ्या लिहिणारा लेखक आज यःकश्चित् म्हणून उपेक्षिला जात नाहीं.

एक काळ असा होता कीं, ललित लेखनाला आणि त्याबरोबरच ललितलेखकालाहि फारसें, फारसें कां, जवळ जवळ अजिबात महत्त्व दिलें जात नसे. एक हलक्या दर्जाचा, पंडितांनीं उपेक्षा करावी, अशा प्रकारचा लेखन-प्रकार या दृष्टीनेंच त्याकडे पाहिलें जाई. त्यांतून द्रव्यप्राप्तीची आशा तर मुळींच नसे. 'काऊ-चिऊ' च्या किंवा 'साळू-माळू' च्या कथा अशीच त्याची संभावना केली जाई !

अव्वल इंग्रजींतील पहिली सुशिक्षित पिढी इंग्रजांच्या आचार-विचारानें व वाङमयानें दिपून गेली होती. 'इंग्रज हे ईश्वराचे प्रेषित; 'जें जें भारतीय, तें तें त्याज्य' या कल्पनेनें सुशिक्षित भारावले होते. 'मराठींत ग्रंथरचना' ही कल्पनाहि त्या काळीं असह्य वाटे. तत्कालिन सुशिक्षित दैनंदिन पत्रव्यवहारहि इंग्रजींत करीत. त्यांच्या व्यतिरिक्त जुन्या पद्धतीनें शिकून तयार झालेले शास्त्री-पंडित, गीर्वाण वाणीशिवाय अन्य कोणत्याहि भाषेला महत्त्व द्यायला तयार

नसत. तात्पर्य, ग्रंथरचना करावयाची ती इंग्रजी वा संस्कृत भाषेंत; देशी भाषेंत नाहीं, अशीच तत्कालीन कल्पना होती.

या कल्पनेला पहिला जबरदस्त धक्का दिला शास्त्री-बुवांच्या निबंधमालेनें. तरीहि ललित वाङ्मय उपेक्षितच होतें. कथा, कादंबऱ्या लिहिल्या जात नव्हत्या असें नाहीं. तत्कालीन हौशी लेखक त्या लिहीतहि; पण बहुतेक भाषांतरित आणि कल्पनारम्य. राजकन्या, राजपुत्र, सरदार, घोडदौडी, हाणमार, संकटें, वेष पालटून हिंडणें, गुप्त भुयारें, खलनायकांचीं दुष्ट कारस्थानें या साऱ्यांतून सुटका व नायक-नायिकेचें मीलन, हाच ठराविक साचा असे. 'मुक्तामाला', 'मंजुघोषा', 'विचित्रपुरी' हीं कांहीं नांवें यांतलीं म्हणून सांगतां येतील.

स्त्रिया—अगदीं पांढरपेशा वर्गांतील स्त्रियाहि अशिक्षित होत्या. पुरुषवर्ग त्या मानानें शिकलेला. तेव्हां वाचक-संख्या मर्यादितच असणार. तरीहि 'नवलकथां'चें वाचन हा कमीपणाचाच प्रकार मानला जाई.

साहजिकच कथा-कादंबरीला त्या काळीं सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. अशा परिस्थितींत ललित वाङ्मय हें सुद्धां एक प्रभावी हत्यार आहे आणि तें नीट वापरणारा लेखक असला तर शरिराला इजा न करतां दुःख दूर करणाऱ्या कुशल शस्त्रवैद्याप्रमाणें तो समाजांतील दोष दूर करूं शकतो, ही गोष्ट प्रथम सिद्ध करून दाखविली ती हरि नारायण आपटे यांनीं.

१८८५ सालीं 'पुणें-वैभव' या त्या काळीं प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिकांत हरिभाऊंच्या 'मधली स्थिति' या

'आज-कालच्या गोष्टीं'तल्या पहिल्या गोष्टीचीं पहिलीं दोन प्रकरणें प्रसिद्ध झालीं. आणि या पहिल्या दोन प्रकरणांनीं पुण्यांतील सुशिक्षित पांढरपेशा समाजांत फार मोठी क्रांति केली.

हरिभाऊंचें आणखी वैशिष्टय म्हणजे ही कथा त्यांनीं टोपणनांवानें लिहावयास प्रारंभ केला होता व आपलें नांव अज्ञात ठेवूनच लेखन करण्याची त्यांची इच्छा होती. आजच्या जमान्यांत 'किंचित्-काव्य' लिहिणाऱ्या कवी-(?) लाहि आपलें नांव त्याखालीं छापून यायला हवें असतें. या पार्श्वभूमीवर हरिभाऊंची प्रसिद्धिपराङ्मुखता विशेषच उठून दिसते.

'I woke up & found myself famous' असें म्हणणाऱ्या एका आंग्ल लेखकाप्रमाणें 'मधली स्थिति'चा कर्ता कोण याची विचारणा सुरू झाली. रा. ब. वि. मो. महाजनी, रा. ब. का. ना. साने यांच्यासारख्या विद्वानांनीं व इतर अनेकांनीं 'पुणें-वैभव'च्या संपादकांकडे या कादंबरीच्या लेखकाचें अभिनंदन करणारीं पत्रें पाठवून लेखकाच्या नांवाची आस्थेनें चौकशी केली. 'पुणें-वैभव' या साप्ताहिकाचे वर्गणीदार वाढूं लागले ; आणि मराठींतहि उच्च दर्जाचें ललित वाङमय लिहितां येतें हें जाणकारांना पटूं लागलें. मराठी कादंबरीच्या यशाची वाटचाल ही अशी सुरूं झाली ; आणि तिला चालना देणारे होते हरिभाऊ आपटे.

## बालपणचे दिवस

मराठी कादंबरीला हें वैभव प्राप्त करून देणारे श्रेष्ठ कादंबरीकार व वाङमयसेवक श्री. हरिभाऊ यांचा जन्म त्यांच्या आजोळीं पूर्व खानदेशांतील पारोळें या गांवीं झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस शके १७८५ मंगळवार, माघ वद्य अमावस्या होता. इंग्रजी दिनांक ८ मार्च १८६४.

अवसेला जन्मलेला मुलगा स्वतःचें व स्वतःबरोबर कुळाचें नांव मोठें करणारा होतो, असा समज आहे. हरिभाऊंनीं तो समज खरा करून दाखविला.

हरिभाऊंचें पाळण्यांतलें नांव बाळकृष्ण असें ठेवण्यांत आलें होतें. पण आपटे कुटुंबांतच आणखी एक बाळकृष्ण असल्याचें लक्षांत आल्यानें तें नांव बदलून 'हरि' हें नांव ठेवण्यांत आलें व तेंच पुढें कायम झालें.

हरिभाऊंचे आजोबा चिमणाजीपंत हे खानदेशांत महालकरी होते. पण त्यांच्या अकालीं मृत्यूनें हरिभाऊंच्या आजीवर मोठाच प्रसंग आला; व हरिभाऊंचे वडील नारायणराव ऊर्फ नानासाहेब व चुलते महादेव ऊर्फ अण्णासाहेब यांना लहानपणीं फार हाल काढावे लागले.

आपलें शिक्षण झालें नाहीं तरी भावाचें व्हावें व कुटुंबियांचा योगक्षेम चालावा म्हणून नानासाहेबांनीं लहान वयांतच इंदूरसारख्या दूर ठिकाणीं नोकरी पत्करली. ते दिसण्यांत तरतरीत, गौर वर्णाचे, निरुपद्रवी, गरीब व मनमिळाऊ होते. हरिभाऊंची आई लक्ष्मीबाई या खानदेशांतील एका सधन मामलेदाराच्या कन्या. पण या प्रेमळ

स्वाभिमानी बाईनें माहेरच्या श्रीमंतीची अभिलाषा कधींहि बाळगिली नाहीं व माहेरच्यांनीं कधीं कांहीं देऊं केलें तर 'घरची गरिबी' म्हणून त्या देणगीचा कधीं स्वीकारहि केला नाहीं. नानासाहेबांनीं अखेरपर्यंत साऱ्या आप्तमंडळींची विचारपूस केली. त्यांना कांहींहि कमी पडूं दिलें नाहीं. हरिभाऊंमध्यें हे सारे गुण वाढत्या स्वरूपांत उतरले होते.

१८६७ सालीं नानासाहेब इंदूरची नोकरी सोडून पुण्यास आले, पण खर्च भागेना म्हणून मुंबईस टपाल-खात्यांत त्यांनीं नोकरी धरली. अण्णासाहेबहि बी. ए. त पहिल्या वर्गांत आल्यानें त्यांना मुंबईस 'नाना शंकरशेट'च्या शाळेंत मुख्याध्यापकाची जागा मिळून दरमहा दीडशें रुपये मिळूं लागले. त्यावेळीं सारी आपटे मंडळी मुंबईस होती.

हरिभाऊ तीन वर्षांचे होते, तेव्हांच बाळंतपणांत ताप येऊन हरिभाऊंच्या मातोश्री स्वर्गवासी झाल्या व हरिभाऊ मातेच्या प्रेमाला पारखे झाले.

अण्णासाहेबांची पत्नी पार्वतीबाई या हरीवर पुत्रवत् प्रेम करीत. नानासाहेबांनीं दोन वर्षांनीं दुसरा विवाह केला; या सापत्न मातेचेंहि हरिभाऊंवर प्रेम होतें. तरी पार्वतीकाकू लवकरच गेल्या आणि त्यांची सापत्न माताहि त्यांना म्हणावी तशी फार दिवस लाभली नाहीं. हरि-भाऊंना आईचा सहवास कमी मिळाला हेंच खरें.

हरिभाऊंचें प्राथमिक शिक्षण 'नानाशंकर शेट' यांच्या शाळेंतच झालें. हरिभाऊ एकुलते एक, दिसण्यांत तरतरीत हुषार म्हणून त्यांचे विशेष लाड होत. शाळेंत तर चुलतेच

मुख्याध्यापक; त्यांचेंहि हरिभाऊंवर प्रेम. साहजिकच शाळेंतहि त्यांचें कौतुक होई.

त्यांना वाचनाचा नाद लहानपणापासूनच विलक्षण होता. अण्णासाहेब त्यांची ही हौस पुरवीत. प्राथमिक शिक्षणानंतर हरिभाऊंचें इंग्रजी तिसरी म्हणजे मराठी सातवीपर्यंतचें शिक्षण मुंबईसच बिशप हायस्कूल-मध्यें झालें.

पुढें अण्णासाहेब एल्एल्. बी. परीक्षेंत पहिले येऊन त्यांनीं अलिबागेस मुन्सफची नोकरी धरल्यानें मुंबईचा खर्च झेपणें कठिण झालें व आपटे कुटुंबीय १८७८ सालीं पुण्यास येऊन राहूं लागले.

वयाच्या नवव्या वर्षी पुण्यासच हरिभाऊंची मुंज मोठ्या थाटांत झाली. त्यावेळचा एक प्रसंग मोठा सांगण्या-सारखा आहे.

हरिभाऊंची पहिली पत्नी मथूताई ही पुण्यांतील गोखले वकिलांची कन्या. या मुलीची आई, मथूला घेऊन मुंजीला आली होती. तिनें बटूच्या वेषांतलें हरिभाऊंचें तें गोजिरें रूप पाहिलें आणि हरिभाऊंच्या एका नातेवाईक स्त्रीला ती म्हणाली, "आमची मथू हरीला द्यायची!"

योगायोगानें पुढें हें लग्न झालें.

## शिक्षण आणि संस्कार

लहानपणीं हरिभाऊंचा स्वभाव फार व्रात्य होता. शिवाय त्यांचे लाडहि होत. त्यामुळें ते खोडकर झाले होते. अनेकांच्या नकला करण्यांतहि ते पटाईत होते.

पुण्यास त्यांच्या घरांत कर्तेपणानें पहाणारी बाई म्हणजे त्यांच्या वडिलांची मावशी चिमाताई. ही फार हुषार व धोरणी बाई होती. आपटे कुटुंबियांसाठीं चिमा मावशींनीं फार कष्ट केले. हरीवर त्यांचा विलक्षण जीव होता.

पुण्यास स्थायिक झाल्यावर हरिभाऊंचें नांव त्या काळीं विश्रामबाग वाड्यांत असणाऱ्या सरकारी हायस्कूल-मध्यें नोंदविण्यांत आलें.

मुंबईच्या मानानें येथलें वातावरण हरिभाऊंना मानवणारें होतें. महादेव मोरेश्वर कुंटे, प्रा. जिन्सीवाले, विष्णुशास्त्री चिपळूणकर अशी व्यासंगी मंडळी त्यांना शिक्षक म्हणून लाभली. विष्णुशास्त्र्यांच्या शिकविण्याचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला. वाचनाची गोडी वाटूं लागली व आपणहि शास्त्रीबुवांप्रमाणें लेखक व्हावें असा विचारांचा एक धागा त्यांच्या मेंदूंत फडफडूं लागला.

नकल्या स्वभाव आणि खोडकरपणा यायोगें विद्यार्थि-वर्गांत ते हवे हवेसे असत. त्यांचें चित्रण त्यांनीं ‘मी’-मध्यें रेखाटलें आहे. अशा एका तात्यापंतोजीची नक्कल तर ते इतक्या सफाईनें करीत, कीं सहकाऱ्यांची हसतां हसतां पुरेवाट होई. त्यांना संस्कृत शिकवायला एक शास्त्री-बोवा येत. त्यांचीहि थट्टा हरिभाऊ मनमुराद करीत. नवें पुस्तक हवेंसें वाटलें कीं जुनें अडगळींत टाकून ‘हरवलें’ म्हणून सांगत. साहजिकच लगेच नवीन मिळे.

हरिभाऊ सरकारी हायस्कुलांत वर्ष-दीड वर्षच होते. कारण देशप्रमानें ओथंबलेल्या व जनतेला शहाणे

करण्याचें ध्येय पुढें ठेवलेल्या चिपळूणकर, आगरकर, लो. टिळक यांनीं नवीन शाळा काढण्याचें ठरविलें व त्या प्रमाणें दि. १ जानेवारी १८८० ला मोरोबादादांच्या वाड्यांत 'न्यू इंग्लिश स्कूल' ही शाळा सुरू झाली. हरिभाऊ हे या शाळेचे पहिल्या 'बॅच'मधील विद्यार्थी.

शाळा विशिष्ट ध्येयानें काढलेली. विष्णुशास्त्री, वामन शिवराम आपटे, आगरकर, लो. टिळक असे शिक्षक. विष्णुशास्त्री यांच्या तासाला हरिभाऊ खरे एकचित्त होत. त्यांची बहुश्रुतता व शिकविण्याची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण होती. कोषकार वामनराव आपटे हे तर संस्कृतचे पंडितच. हरिभाऊंना आधींच वाङमयाची आवड. त्यांत 'अमरकोश', 'रघुवंश' हे ग्रंथराज शिकून झालेले. साहजिकच वामनराव आपटे यांच्यासारखे शिक्षक त्यांच्यावर खूष असत. एखाद्या श्लोकाचा अर्थ हरिभाऊंनीं आपल्या कल्पनेप्रमाणें विशद केला व तो बरोबर असला तर वामनराव आपटे तसें म्हणतहि.

शाळेच्या पुस्तकांत एखाद्या कवीची एखादीच कविता असे. पण ती तेवढीच वाचून हरिभाऊंचें समाधान होत नसे. त्या कवीचीं मिळतील तेवढीं काव्यें ते वाचून काढीत.

१८८१ मध्यें आगरकरांनीं 'केसरीं'त एक लेख लिहून 'कालिदासापेक्षां भवभूति श्रेष्ठ आहे' असें म्हटलें होतें. हरिभाऊंनीं अत्यंत नम्रपणें एक लेख लिहून 'आगरकरांचें म्हणणें तितकेंसें सयुक्तिक नसून भवभूतिपेक्षां कालिदासच श्रेष्ठ ठरतो', असें दाखविलें होतें. या

त्यांच्या लेखाबद्दल वामनराव आपटे यांनीं त्यांचें कौतुक केलें होतें.

सर्व विषयांत चांगली प्रगति असणारे हरिभाऊ गणितांत मात्र रमूं शकत नसत. तो विषय त्यांना कधींच जमला नाहीं. वामनराव आपटे विनोदानें त्यांना ' Great Hero of Mathematics ' असें म्हणत !

१७ मार्च १८८२ ला विष्णुशास्त्री अचानक कालवश झाले. ऐन तारुण्यांतील एका बुद्धिमान व्यक्तीच्या या मृत्यूनें सारा महाराष्ट्र हळहळला. त्यांच्या निकटवर्ति सहकाऱ्यांना व शिष्यवर्गाला केवढा धक्का बसला असेल याची कल्पनाच करवत नाहीं.

हरिभाऊंची कवित्वशक्ति जागृत होऊन त्यांनीं कै. विष्णुशास्त्री यांच्या गुणवर्णनपर ' शिष्यजनविलाप ' या नांवाची एक कविता लिहिली. ही कविता तत्कालिन विद्यार्थी व इतरेजन यांना इतकी आवडली कीं या प्रदीर्घ कवितेच्या सर्व प्रति दोन महिन्यांत खलास होऊन त्याची नवी आवृत्ति काढावी लागली.

आगरकर, लो. टिळक हे कोल्हापूर प्रकरण खटल्यांत गढले होते. त्यांनीं हरिभाऊंची ' शिष्यजनविलाप ' ही कविता वाचून म्हटलें कीं, " ज्या संस्थेंतले विद्यार्थी इतकें सुंदर काव्य करतात त्या संस्थेचा भविष्यकाल निश्चित उज्ज्वल आहे. "

## शिक्षणाला पूर्णविराम

विद्यार्थीदशेंतहि हरिभाऊ शालेय अभ्यासाव्यतिरिक्त इतर बाबींतहि लक्ष घालीत. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी 'पुरी हौस फिटली' ही आपली पहिली कथा त्यांनीं लिहिली.

त्यावेळीं शंकर मोरो रानडे हे 'नाटचकथार्णव' हें मासिक काढीत. त्याच्या वाचनानें आपणहि चांगल्या इंग्रजी, संस्कृत पुस्तकांचें भाषांतर करावें अशी स्फूर्ति हरिभाऊंना झाली.

'लाँगफेलो' या कवीच्या 'Psalm of life' चें कविताबद्ध रूपांतर टोपणनांवानें त्यांनीं 'केसरी' कडे पाठविलें; आणि हें टोपणनांवी लेखक हरिभाऊच, याची कल्पना नसतांहि 'केसरी'नें तें स्वीकारलें.

लो. टिळक व आगरकर यांना कोल्हापूर प्रकरणीं शिक्षा झाली, तेव्हां सारा तरुण महाराष्ट्र त्यांना देवाप्रमाणें भजूं लागला. त्यांच्या मदतीसाठीं जो निधि जमविण्यांत आला त्यांत विद्यार्थिवर्गातर्फें हरिभाऊंनीं पुढाकार घेतला; आणि लोकमान्य व आगरकर यांची सुटका झाली तेव्हां पुणेंकरांनीं त्यांचा जो प्रचंड सन्मान केला त्यांतहि हरिभाऊंचा भाग होता. लोकमान्यांबद्दलच्या त्यांच्या निष्ठेला कधींहि तडा गेला नाहीं.

१८८२ त हरिभाऊ मॅट्रिकच्या परीक्षेला पहिल्यानें बसावयाचे. सर्व विषयांत चांगले गुण पडूनहि गणितानें

दगा दिल्यानें त्यांना फॉर्म मिळूं शकला नाहीं. पण १८८३ त मात्र हरिभाऊ मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले व त्यांच्या वाङमयाच्या अभ्यासाला अधिक व्यापक क्षेत्र मिळून त्यांनीं डेक्कन कॉलेजमध्यें नांव घातलें.

दरम्यान त्या काळच्या रिवाजाप्रमाणें वयाच्या सतराव्या वर्षींच हरिभाऊंचा विवाह, त्यांच्या मुंजींत मातृभोजनाच्या वेळीं ठरल्याप्रमाणें, गोखले-कन्या 'मथू' हिच्याशींच झाला. विशेष म्हणजे या लग्नांत हरिभाऊंनीं हुंडा म्हणून एक पैहि घेतली नाहीं. त्यांच्या पत्नीचें वळण जुनें होतें. घरांतहि जुनेंच वळण होतें.

हरिभाऊंचे विचार प्रगल्भ झाले ते मिलच्या 'Subjection of women' (स्त्रियांचें परावलंबित्व) या पुस्तकानें. हर्बट स्पेन्सरच्या शिक्षणविषयक विचारांनीं त्यांना भारून टाकलें होतें. याच वेळीं कॉलेजांतील त्यांचे स्नेही श्री. बापट यांच्या भगिनी सौ. काशीताई कानिटकर या सुशिक्षित स्त्रीच्या परिचयानें आपली पत्नीहि शिकलेली असावी, यासाठीं त्यांचा जीव तुटे. पत्नीला शिकविण्यासाठीं त्यांनीं बरेच प्रयत्न केले. परंतु, खरें सांगायचें म्हणजे तत्कालिन गृहपरिस्थिति व समजुती यांमुळें पहिल्या पत्नीच्या शिक्षणाच्या बाबतींत त्यांना यावें तसें यश आलें नाहीं.

कॉलेजांतील हरिभाऊंचें जीवन खरोखरीच चांगलें गेलें. बहुश्रुतता, अफाट वाचन, गोडवा स्वभाव, दुसऱ्यासाठीं चार पैसे खर्च करण्याची तयारी, त्यामुळें कॉलेजच्या आयुष्यांत त्यांनीं अनेक मित्र गोळा केले. डेक्कन कॉलेजचें

निसर्गरम्य वातावरण, प्रा. सेल्बी, भांडारकर यांसारखे विद्वान् प्राध्यापक, प्रेमळ स्नेही, सारेंच तेथें चांगलें होतें.

मिल, स्पेन्सर, डिकन्स, मेकॉले, जॉन्सन, थॅकरे, शेक्सपिअर आदि इंग्रजी व अनेक इतर लेखकांच्या ग्रंथांचें वाचन त्यांनीं याच वेळीं केलें. प्रा. पानसे, ना. म. समर्थ, चौबळ, वांगीकर हे त्यांचे त्या वेळचे स्नेही. 'Popular' या नांवानें हें स्नेहीमंडळ ओळखलें जात असे.

हरिभाऊंना खेळाची आवड विशेष नव्हती. सहलीला जाणें व गप्पा मारणें हेच त्यांचे फुरसतीचे छंद.

पण येथेंहि गणितानें दगा दिला व हरिभाऊ पहिल्या परीक्षेंत नापास झाले. त्याच वर्षीं फर्ग्युसन कॉलेज निघालें. शाळेप्रमाणेंच कॉलेजचे पहिल्या 'बॅच'चे विद्यार्थी होण्याची संधि त्यांना येथेंहि मिळाली. पहिल्याच वर्षाचे विद्यार्थी म्हणून त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजांत नांव घातलें.

आगरकर, लोकमान्य टिळक, आपटे हा पूर्वींचाच शिक्षकवर्ग प्राध्यापक म्हणून तेथें होता. प्रा. वा. बा. केळकर इंग्रजी शिकवीत. हरिभाऊंचा शेक्सपिअरचा अभ्यास इतका गाढा होता कीं प्रा. केळकरहि याबाबत त्यांच्याशीं चर्चा करीत.

सरकारी नोकरी करावयाची नाहीं हें हरिभाऊंनीं पहिल्यापासून ठरविलें होतें. रेनॉल्ड्सच्या कादंबऱ्या वाचून आपल्याकडील समाजस्थितीवरहि कांहींतरी लिहावें अशी इच्छा त्यांना झाली. त्या काळीं सुशिक्षितांची पहिली पिढी इंग्रजाच्या स्तुतीबरोबर मद्यपानासारख्या व्यसनांत भूषण मानूं लागली होती. या दुर्गुणानें समाजाचें केवढें नुकसान होत आहे, हें दाखवावें या उद्देशानें 'आजकालच्या

गोष्टीं 'तील पहिली कथा 'मधली स्थिति' ही लिहावयास हरिभाऊंनीं प्रारंभ केला.

आपल्या 'सुधारक' पत्रांतून रूढीराक्षसीच्या मगरमिठींतून पांढरपेशा समाज बाहेर पडावा म्हणून एखाद्या खाष्ट तात्यापंतोजीप्रमाणें आगरकर आपल्या जळजळीत विचारांचे आसूड ओढीत होते. त्यांचे विचार पटत; पण गतानुगतिक समाजाला ते अमलांत आणायचें धैर्य नव्हतें. तथाकथित सनातन्यांना तर सुधारणेविरुद्ध ओरड करायला हवीच होती.

अशा वेळीं समाजाला विश्वासांत घेऊन, आई मुलाला काऊ-चिऊच्या गोष्टी सांगून भरवते त्याप्रमाणें शर्करावगुंठित गोळ्या देण्याची जरूर होती. मनोरंजनाच्या शर्करेंत दोष गुंडाळले तर ते पटवून घेऊन त्यांत सुधारणा करायला समाज तयार होईल ही भूमिका हरिभाऊंची होती. गोविंदराव कानिटकर व त्यांच्या सुविद्य पत्नी काशीताई यांच्या सहवासानें त्यांचे हे विचार पक्के होऊं लागले.

१८८६ त गणित विषयामुळें कॉलेजच्या पहिल्या परीक्षेत तिसऱ्यांदां अपयश आल्यामुळें त्यांनीं कॉलेजशिक्षणाला पूर्णविराम दिला. पुढें काय? हा प्रश्नच नव्हता. सरकारी नोकरी करावयाची नव्हती.

## 'करमणुकीं'तून कर्तबगारी

गोविंदराव कानिटकर यांनीं 'कानिटकर आणि मंडळी' तर्फे 'मनोरंजन' या नांवाचें मासिक सुरू केलें.

कै. काशिनाथ रघुनाथ मित्र यांनीं काढलेलें ' मनोरंजन ' तें हें नव्हे; तें मागाहून सुरू झालें.

' मनोरंजन 'चा पहिला अंक १८८६ च्या जुलैमध्यें निघाला. यांत हरिभाऊंची ' गणपतराव ' ही व काशीताईंची ' रंगराव ' ही कादंबरी येत असे. याव्यतिरिक्त ' चाणाक्षपणाचा कळस ' ही अपूर्ण कादंबरी 'श्रुतकीर्ति', ' जयध्वज ' हीं दोन नाटकें, 'मारून मुटकून वैद्यबोवा ' व ' पळपुटचा वैद्य ' हीं दोन रूपांतरित प्रहसनें एवढें साहित्य हरिभाऊंनीं या ' मनोरंजन 'मध्यें लिहिलें.

१८९२ मध्यें हें मासिक बंद पडलें. त्यापूर्वींच त्यांचें चुलते अण्णासाहेब यांनीं १८८८ मध्यें संस्कृत ग्रंथप्रकाशन, स्वामी-संन्याशांची सोय व आपटे कुटुंबांतील विद्यार्थ्यांचें शिक्षण व्हावें या उद्देशानें 'आनंदाश्रम' संस्थेची स्थापना करून हरिभाऊंना त्याचे व्यवस्थापक नेमलें होतें. त्यामुळें मुख्य व्यवसायाचा प्रश्न सुटला होता; तरी लेखनाची अनिवार हौस त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती.

'कुलकर्णी आणि मंडळी'तर्फे ' करमणूक ' साप्ताहिक छापण्याचें ठरवून १८९० च्या ऑक्टोबरमध्यें त्यांनीं ' करमणुकी 'चा नमुना अंक सादर केला.

मनाची करमणूक करून जनतेचें ज्ञान वाढविणें; त्यासाठीं पाणचट, अश्लील मजकूर न देतां ' पुढील माडीपासून फणी-करंड्याचे पेटीपर्यंत ज्याचा प्रवेश होईल ', असें वाङ्मय व तेंहि मनोरंजक पद्धतीनें देऊन जनतेला सहजपणें शहाणे करणें हा ' करमणुकी 'चा उद्देश होता. ' पाणचट, चावट वाङ्मयाची आवड असणारांनीं

वर्गणीदार होऊन निराशा करून घेऊं नये', असाहि मित्रत्वाचा इशारा त्यांनीं दिला होता.

कथा-कादंबरीव्यतिरिक्त हास्यकारक चुटके, थोरा-मोठ्यांचीं चरित्रें, पदार्थविज्ञान व शास्त्रीय विषयावर चुरचुरीत लेख, 'केशवसुतां'सारख्या कवींच्या कविता, नाट्यवाङ्मय असें कितीतरी विविध व रसपरिपूर्ण वाङ्मय 'करमणुकी'नें दिलें; आणि तेंहि अगदीं अल्प वर्गणींत. लोक 'करमणूक' वाचण्यासाठीं उत्सुक असत. लहान मुलांत तर भांडणें चालत. फणी-करंड्याच्या पेटीपर्यंत खरोखरीच तिचा प्रवेश असे. 'सगुणाबाईंचीं पत्रें' त्या काळीं स्त्री-वर्गांत फार प्रिय होतीं. 'करमणुकी'बाबत अनेक वाचकांनीं व वृत्तपत्रांनीं धन्योद्गार काढलेले आहेत.

'करमणुकी'च्या द्वारां हरिभाऊंनीं मराठी वाङ्मयाचा वृक्ष सत्तावीस वर्षें जोपासला व मराठी कादंबरीचें नांव उज्ज्वल केलें. आठ सामाजिक व दहा ऐतिहासिक कादंबऱ्या, काव्य, नाटकें, कथा व इतर अनेक साहित्य त्यांनीं 'करमणुकीं'तून लिहिलें.

१८८५ पासून १९१७ पर्यंत बत्तीस वर्षें हरिभाऊंनीं अखंड लेखनांत घालविलीं. तत्कालिन सुशिक्षितांप्रमाणें मराठीची अवहेलना न करतां मराठींतच विपुल लेखन करून ललित वाङ्मयाला एक प्रतिष्ठा आणून दिली. त्यासाठीं मराठीव्यतिरिक्त इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच, जर्मन या भाषाहि त्यांनीं अभ्यासिल्या व एकदां स्वीकारलेला कर्मयोग अखेरपर्यंत आचरणांत कायम ठेवला.

## साहित्यांतून समाजदर्शन

हरिभाऊंच्या लेखनाला एक बैठक होती. त्यांचीं सारीं कथानकें एकमेकांशीं सांखळीप्रमाणें जोडलेलीं आहेत. केवळ पांढरपेशा सुशिक्षित वर्ग डोळ्यापुढें ठेवून त्याभोंवतींच कथानकांची गुंफण केल्यानें अत्यंत नीरस कादंबऱ्या लिहिणारे डॉ. केतकरांसारखे लेखक त्यांना 'सदाशिवपेठी कादंबरीकार' म्हणून हिणवीत होते. तरी 'तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी' ही प्रागतिकांची दूषणोक्ति लोकमान्यांना जशी भूषणोक्ति ठरली तशी 'सदाशिवपेठी कादंबरीकार' ही उक्ति हरिभाऊंचें भूषणच ठरली आहे. समाजोन्नतीचें अत्यंत प्रचंड कार्य करण्यांत हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा फार मोठा वांटा आहे हें त्यांच्या टीकाकारांनाहि मान्य करावें लागेल.

लहानपणापासून समाज व व्यक्ति यांचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची संवय, अंतःकरणापासून लेखक होण्याची तळमळ, समाजाच्या भल्याची काळजी, स्त्रियांच्या मागासलेपणाबद्दल खंत; या साऱ्यांच्या जोडीस प्रचंड वाचन व मनन यामुळेंच हरिभाऊ अद्वितीय लेखक ठरले; आधुनिक भाषेंत सांगावयाचें तर 'साहित्यिक' झाले.

सुशिक्षितांच्या पहिल्या पिढीचें विदारक चित्रण त्यांनीं 'मधल्या स्थितीं'त दाखविलें आहे. तसे विनायकराव व गोविंदराव वकील आजहि समाजांत दिसतात.

सामाजिक सुधारणेपेक्षां राजकीय सुधारणा आधीं असें आग्रहानें सांगणारा यशवंतराव 'यशवंतराव खरे' या कथेंत दिसतो.

देशोन्नतीस आत्मत्याग आवश्यक, त्याशिवाय सर्व व्यर्थ, असें सांगणारा संन्याशी भावानंद 'मीं'त भेटतो; तर मिलच्या 'Subjection of Women' नें मोहित होऊन समाजसुधारणा व स्त्री-शिक्षण यांकडे झुकणारा गणपतराव 'गणपतराव' या कादंबरींत भेटतो.

औद्योगिक विकासाशिवाय देश पुढें येणार नाहीं असें अट्टाहासानें ओरडणारा लटपटचा 'कृष्णाबापू', जहाल अराजकतेकडे झुकणारा नारायणराव हे सर्व 'आजच' या अपूर्ण कादंबरींत पहावयाला सांपडतात; तर कॉलेजांत नास्तिक असलेला चंद्रशेखर अद्वैतानंदाच्या दर्शनानें धार्मिक वृत्तीचा बनून धर्मश्रद्धेवांचून कर्मश्रद्धा फुकट आहे असें सांगूं लागतो.

एकत्र कुटुंबपद्धतींतील दोष, स्त्रियांचे होणारे हाल, त्यांना सोसाव्या लागणाऱ्या यातना, त्यासाठीं समाजसुधारकांचे प्रयत्न हे विषय थोड्या फार अंशानें त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांतून आले आहेत.

पुनर्विवाहित दांपत्याच्या मुलीवर कोसळलेलें संकट व राजारामासारख्या समाजसंकटकांच्या कारवाया, तदनुषंगानें पति-पत्नींत विश्वासाचें वातावरण कसें हवें या बाबतचे उद्‌बोधक विचार 'भयंकर दिव्य' दाखवितें.

मालमत्तेच्या लोभानें सुशिक्षित माणसें कशीं दुष्ट होतात व स्वतःच्या पत्नीला छळतात हें 'मायेचा बाजार' -मधील पद्‌मेचे पतिराज अण्णासाहेब सांगतील. पद्‌मेवरील प्रेमानें जन्मभर अविवाहित रहाणारा वसंतरावहि येथेंच भेटतो.

## लेखनाला लाभलेली लोकप्रियता

या सर्व कथा लिहितांना हरिभाऊंची एक विशिष्ट दृष्टि दिसते. ती म्हणजे अश्लील व गलिच्छ असें कांहींहि न लिहितां जे विचार समाजसुधारणेस उपयोगी पडतील त्यांचीच मांडणी करणें.

हें सारें करतांना त्यांनीं ललित-लेखकाची भूमिका सोडलेली नाहीं. 'माझ्या कथेंत एकहि व्यक्तिरेखा अशी नाहीं कीं जिला वस्तुस्थितीचा आधार नाहीं', असें ते सांगत; नि तें खरें होतें.

विष्णुपंत, गणपतराव, रघुनाथराव, यशवंतराव, श्रीधरपंत, भावानंद, शिवरामपंत, प्रभाकर, पद्माकर, वसंतराव, चंद्रशेखर हीं सर्व पांढरपेशा समाजांतील तत्कालीन निरनिराळ्या मतांचीं प्रतीकें आहेत. जानकीबाई, सरस्वति, उमाबाई, यमुना, तिची आई गोपिकाबाई, राधाबाई, गंगाबाई, माईसाहेब, ताई, सुंदरी या तत्कालिन स्त्रियांतील साध्वींचे नमुने त्यांनीं वाचकांपुढें ठेवले ते त्यांना अशा सद्‌गुणी स्त्रियांबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीमुळेंच. याउलट काकूबाई, उमाबाई, माईसाहेब, वहिनी, रखमाबाई, सीताबाई, सोनी, सखूताई या खटयाळ, कजाग व दुष्ट स्त्रियांचीं प्रातिनिधिक व्यक्तिचित्रेंहि त्यांनीं तितक्याच सफाईनें रंगविलीं आहेत.

विनायकासारखीं सावजें हेरून स्वतःची तुंबडी भरणारे पाजी गोविंदराव वकील. स्वतःच्या धार्मिक विधीला ब्राह्मण मिळाले पाहिजेत म्हणून पोरसवदा सुनेला कोंडून

ठेवून तिचें केशवपन करणारे शंकर मामंजी. कमलेवर संकट आणणारा 'भयंकर दिव्यां'तला राजाराम. साध्वी पत्नीला छळणारे अण्णासाहेब. या व्यक्ति अगदींच काल्पनिक नव्हत्या. साठ टक्के सत्याचा अंश त्यांत नक्की होता. समाजाचें निरीक्षण हरिभाऊंनीं फार जवळून केलें होतें.

रास्ता पेठेंतील बंगल्यांत जमणारे रामभाऊ मास्तर, अनंतराव वकील, जनार्दनपंत मांजरे, केशवराव भुस्कुटे, गोपाळराव महाशब्दे, डॉ. मुंगळे, कृष्णाजीपंत लुकडे एकाक्ष गोविंदराव व विनायकराव, ही मंडळी 'मदिरा मंडळा'ची सदस्य वाटतात! कोणी सांगावें, गडकऱ्यांना 'आर्य मदिरा मंडळा'ची बीजरूप कल्पना यावरून सुचलीच नसेल? नाटकाच्या वेडानें वायां गेलेले गण्या, नान्या आजहि दिसतात.

ज्यूरीला जायचा वशिला लावून त्या पैशांतून व कोणाकडूनहि चिरमिरी मिळवून त्यांतून आपला जोडा, धोतरें यांचा खर्च भागविणारे, दुसऱ्याकडून चहा, विडी उकळणारे व जातां येतां परनिंदा करणारे 'भयंकर दिव्यां'तले सदुनाना व प्रो. ड्यांडी. 'मायेचा बाजारां'तील दिगंबरपंत, 'यशवंतराव खरे' मधील स्वतःच्या अधिकारावर खूष असलेले रा. ब. आडमुठे. 'आतां हें पहा' चा मंत्र घोळणारे लाळघोटे शास्त्रीबुवा. या व्यक्तिरेखा तत्कालिन समाजाचें प्रतिबिंब तर दाखवितातच, पण दीर्घकाल चालणाऱ्या कथानकाला थोडा विरंगुळाहि देतात.

साधी प्रसादयुक्त भाषा, कथानकांतील व्यक्तींचे एकमेकांशीं जुळविलेले पक्के दुवे, जिव्हाळ्याचे प्रश्न, घरगुती

वाक्प्रचार, तत्कालिन पांढरपेशाचें रहाणीचें, हावभावांचें, बोलण्याचें, विचारांचें अचूक वर्णन यामुळें हरिभाऊंच्या कादंबऱ्या लोकांना विलक्षण आवडल्या.

अद्भुत जगांत वावरणाऱ्या नायक-नायिका मागें पडल्या. दैनंदिन जीवनांतले प्रसंगहि चटका लावील अशा कथानकांचे विषय होऊं शकतात, हें सुशिक्षित वाचकांना नव्यानेंच आकलन होऊं लागलें. पांढरपेशा समाज डोळे उघडून पाहूं लागला. हरिभाऊंचे पांढरपेशा समाजावर हे कधींहि न फिटणारे उपकार आहेत. जें कठोर टीकेनें साध्य झालें नाहीं तें त्यांच्या ललित वाङ्मयानें साधलें.

## ऐतिहासिक कादंबऱ्यांची कामगिरी

'ऐतिहासिक कादंबरीकार' या नात्यानें हरिभाऊंची योग्यता फारच मोठी आहे. १८९५ सालीं महाराष्ट्रांत एक फार मोठी व चांगली गोष्ट झाली. आपल्या इतिहासाबद्दल संशोधन होऊन तरुण मंडळींना आपल्या पूर्वजांच्या इतिहासाची गोडी लागावी या दृष्टीनें प्रयत्न होऊं लागले. या निमित्तानें हरिभाऊंची स्फूर्ति व देशप्रेम उफाळून आलीं. त्यांनीं तत्कालिन मिळाल्या त्या बखरी व कागदपत्र वाचले आणि ऐतिहासिक कादंबरी-लेखनाची तयारी केली.

ऐतिहासिक कादंबरी म्हणजे निर्भेळ इतिहास नव्हे. त्यांत काल्पनिकाची भेसळ करावीच लागते. पण तीहि अशी कीं कथेची रंगत वाढावी पण त्यायोगें ऐतिहासिक सत्याला मात्र धक्का पोहोंचूं नये. हरिभाऊंनीं 'म्हैसूरचा

वाघ', 'उषःकाल', 'केवळ स्वराज्यासाठीं', 'रूपनगरची राजकन्या', 'चंद्रगुप्त', 'गड आला पण सिंह गेला', 'सूर्योदय', 'मध्यान्ह,' 'सूर्यग्रहण,' 'कालकूट' व 'वज्राघात' अशा एकूण अकरा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. 'उषःकाल', 'केवळ स्वराज्यासाठीं,' 'गड आला पण सिंह गेला' व 'सूर्योदय' या चारी कादंबऱ्यांतून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिरेखेला प्राधान्य आहे.

त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून लहानमोठ्या शंभराहून अधिक व्यक्तिरेखा आहेत. 'केवळ स्वराज्यासाठीं'तील राजाराम, 'काळकूटां'तील पृथ्वीराज चव्हाण, 'मध्यान्हां'तील सवाई माधवराव या व्यक्तिरेखा ऐतिहासिक आहेत. तर'उषःकाल'मधील सावळ्या, नानासाहेब, श्रीधरस्वामी, 'रूपनगरची राजकन्या'मधील रूपमति, 'म्हैसूरचा वाघ'मधील कासीम हीं व्यक्तिचित्रें काल्पनिक आहेत. 'उषःकाल', 'गड आला पण सिंह गेला,' 'रूपनगरची राजकन्या' यांमध्यें हरिभाऊंचें सारें लेखनकौशल्य परिपूर्णतया प्रगट झालें आहे. काल्पनिक आणि ऐतिहासिक प्रसंगांचें व व्यक्तींचें इतकें बेमालुम मिश्रण, खऱ्या प्रतिभावान लेखकाशिवाय इतरांना करतां येणें शक्य नाहीं.

'उषःकाल' मधील अज्ञात घोडेस्वार, तीळतीळ सरकणारी मारुतीची मूर्ति, स्वामिनिष्ठ, चपळ सावळ्या हीं व्यक्तिचित्रें एकदां वाचल्यावर पुन्हां विसरणें शक्य नाहीं. कुमारवयांत ही कादंबरी वाचून ज्याच्या चित्तवृत्ति देशाभिमानानें भरून आल्या नाहींत व देशासाठीं आपणहि कांहीं

तरी असेंच साहस करावें, असें वाटून जो तहानभूक विसरूं शकला नाहीं असा अभागी कोणी असेल, असें वाटत नाहीं.

ब्रिटिश साम्राज्याच्या आधींच्या स्वराज्यांतील बाणेदार, स्वाभिमानी स्त्री-पुरुषांचीं उदात्त व भव्य चित्रें रेखाटून तत्कालिन तरुणांचें देशप्रेम जागें करणें, हाच ऐतिहासिक कादंबरी-लेखनांतला हरिभाऊंचा प्रमुख उद्देश होता; आणि तो निःसंशय सफल झाला. हरिभाऊंच्या नंतर कै. नाथमाधव व आणखी कांहीं लेखकांनीं ऐतिहासिक कादंबरी लिहिली. कांहींना त्यांत यशहि मिळालें. तरी हरिभाऊंचें हें स्थान कोणीहि हिरावून घेऊं शकत नाहीं. या बाबतींत स्कॉट् हा त्यांचा आदर्श; पण स्कॉटपेक्षांहि हरिभाऊंची कामगिरी सरस आहे.

हरिभाऊंचा लिहिण्याचा वेग जबरदस्त होता. सामाजिक व ऐतिहासिक दोन्ही कादंबऱ्या ते एकाच वेळीं लिहीत. शिवाय त्या हप्त्यानें प्रसिद्ध व्हावयाच्या. त्यामुळें वृत्तपत्रीय लेखनांत येणारे पाल्हाळ वा पुनरुक्ति या दोषांपासून त्यांच्या कादंबऱ्या अलिप्त नाहींत. तरीहि त्यांच्या लेखनाकडे आजच्या दृष्टिकोनांतून पाहून चालणार नाहीं.

'सति पिंगला' व 'संत सखू' हीं दोन नाटकें त्यांनीं लिहिलीं. पण तीं म्हणावीं तशीं यशस्वी होऊं शकलीं नाहींत. काव्य तर ते हातोहात करीत. खरें म्हणजे ते शीघ्रकविच होते. 'शिष्यजनविलाप' तर गाजलेंच; 'गीतांजली'चेंहि भाषांतर त्यांनीं केलें होतें. मित्रमंडळींत गप्पा मारतां मारतां काव्याचे चुटके तर ते अनेक रचीत. पण लिहून ठेवण्याची काळजी न घेतल्यानें ते तिथेंच विराम पावत.

## हरिभाऊ : व्यक्तिदर्शन

सौ. काशीताई कानिटकरांच्या सहवासानें स्त्री सुशिक्षित असली म्हणजे 'काव्यशास्त्रविनोदांत' ती पतीशीं कशी समरस होऊं शकते हें त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें होतें. श्री. व सौ. कानिटकर आणि स्वतः हरिभाऊ यांच्या वाङमयविषयक गप्पा तर नेहमींच चालत.

आपल्या पहिल्या पत्नीला शिकवावी, शहाणी करावी अशी त्यांची फार इच्छा; पण ती अपुरी राहिली. १८९१ मध्यें बाळंतपणाच्या आजारांतच त्यांची पहिली पत्नी वारली. कोमल मनाच्या हरिभाऊंना भारी दुःख झालें व पुनः दुसरा विवाह करावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें. तरी घरच्या मंडळींच्या इच्छेसाठीं त्यांना पुनश्च लग्न करावें लागलें. ही पत्नी त्या काळच्या मानानें शिकलेली होती. तरी सुधारक मताच्या हरिभाऊंनीं पुनर्विवाह केला नाहीं याबद्दल कांहीं वृत्तपत्रांनीं त्यांना दोष दिलाच. पहिल्या पत्नीच्या आठवणीनें व या टीकेमुळें हरिभाऊ कांहींसे अबोल बनले. दुसऱ्या पत्नीकडेहि प्रारंभीं त्यांनीं द्यावें तसें लक्ष दिलें नाहीं.

त्यांतच गोपाळराव जोशी या गृहस्थाच्या उपद्व्यापामुळें 'पंचहौद मिशन' चहा-प्रकरण निघालें; व ज्यांना आमंत्रणें होतीं ते सर्वच हजर नव्हते तरी हजर होते व नव्हते त्या सर्वांचीं नांवें 'पुणें वैभवां'त छापून आलीं. ग्रामण्य प्रकरण उद्‌भवलें. प्रायश्चित्तें घेतलीं गेलीं. हरिभाऊ या चहाला

जाणार होते, पण कांहीं अडचणीमुळें ते जाऊं शकले नाहींत. जेव्हां तसा खुलासा करावा म्हणून त्यांना सल्ला दिला तेव्हां प्रामाणिक मनाचे व विचाराचे हरिभाऊ म्हणाले, "मी जाऊं शकलों असतों तर खास हजर असतों. तेव्हां आतां नाहीं म्हणून कातडी बचावणें मला पसंत नाहीं."

हरिभाऊ आनंदाश्रमांतच रहात. पुढें मोठ्या घरांतून त्यांची द्वितीय पत्नीहि आनंदाश्रमांत येऊन राहिली व हरिभाऊंचें स्वतःचें बिऱ्हाड झालें. पत्नीकडे ते आस्थेनें लक्ष पुरवूं लागले. सभा, संमेलनें, फिरावयास जाणें या सर्व ठिकाणीं ते पत्नीला बरोबर नेत. प्रवासांतहि ती त्यांच्या बरोबर असे. बहुश्रुतता व शिक्षण यामुळें तिच्याहि विचारांत फरक पडत होता.

आनंदाश्रमाच्या कामाव्यतिरिक्त हरिभाऊंचा सारा वेळ लेखन, वाचन यांत जाई. मित्रमंडळींचा अड्डा असायचाच. माणसांची त्यांना फार आवड. त्यामुळें नातेवाईक, स्नेही, त्यांचीं मुलें यांची घरांत नेहमीं गर्दी असावयाची.

पहांटे तीनला उठून ते लिहावयास बसत. मग सहा वाजतां चहा घेऊन पर्वतीला फिरावयाला जात. मित्र-मंडळी बरोबर असतच. कुणा ना कुणाकडे चहा, फराळ असेच. चहाबरोबर बिस्किटें-पाव खायचा तोहि चोरून, इतरत्र वाच्यता न करतां. पाव व बिस्किटें यांना 'स्वामी व बटू' अशी संज्ञा होती व चहापानाचें निमंत्रण आलें कीं 'स्वामी व बटू' उपस्थित रहाणार आहेत काय, असा प्रश्न विचारला जाई !

इराण्याकडे सहकुटुंब चहा घेणाऱ्या आजच्या आपल्या पिढीला 'पंचहौद मिशन चहा प्रकरण' व पाव-बिस्किटें या आज कोठेंहि चालणाऱ्या वस्तूंना त्या काळीं असलेलें निषिद्धत्व पाहिलें म्हणजे हंसूं येईल. ५०-६० वर्षांत काळांत पडलेला हा फरक फार मोठा आहे. पण तत्कालिन समाजसुधारकांना कोणत्या दिव्यांतून जावें लागत होतें याची कांहींशी कल्पना यावरून येऊं शकेल.

१९०३ ते १९१३ हा दहा वर्षांचा काळ हरिभाऊंच्या जीवनांत फार सुखाचा गेला. याच दहा वर्षांच्या काल-खंडांत त्यांना 'शांता उर्फ ताई'सारख्या बुद्धिमान कन्येचा पिता होण्याचें भाग्य लाभलें. १९१२ सालीं अकोला येथील साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. कॉलेजची परीक्षा केवळ गणित विषयामुळें ज्यांना उत्तीर्ण होतां आली नाहीं ते हरिभाऊ स्वकर्तृत्वानें मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए. च्या परीक्षेचे परीक्षक म्हणून नेमले गेले.

गोपाळराव गोखले त्यांचे चांगले स्नेही होते. न्या. रानड्यांशीं त्यांचे संबंध आपुलकीचे होते. ललित लेखन करीत असतांना हरिभाऊंनीं सार्वजनिक जीवनांतहि अंग चोरून काम केलें नाहीं. सार्वजनिक सभा जहालांनीं काबीज केल्यावर न्या. रानडे यांच्या मार्गदर्शनाखालीं निघालेल्या डेक्कन क्लबचे ते चिटणीस होते. १८९६ च्या दुष्काळांत निरनिराळ्या शंभर खेड्यांतून माहिती मिळवून त्याबाबत उत्तम अहवाल त्यांनीं तयार केला.

१८९६-९७ मध्यें प्लेगनें उग्र रूप धारण केलें होतें. कुटुंबेंच्या कुटुंबें धुळीला मिळालीं. आजारी माणसाला

त्याचे नातेवाईक विचारीनात. अशा स्थितींत लो. टिळकांच्या प्रेरणेनें निघालेल्या प्लेग हॉस्पिटलमध्यें ते स्वयंसेवक म्हणून काम करीत. त्यासाठीं दिवस-रात्र, काळवेळ ते पहात नसत. पदरचे पैसे खर्च करीत, अनाथांना दिलासा देत, त्यांची सोय करीत. या कामगिरीबद्दल त्यांना सरकारकडून 'कैसर-ई-हिंद' पदक मिळालें. त्यांच्या कामगिरीवर खूष होऊन सरकारनें त्यांची पुणें नगरपालिकेंत सरकारतर्फें म्हणून नेमणूक केली. तेथेंहि अनेक समित्यांवर त्यांनीं आस्थापूर्वक काम केलें. स्कूल बोर्डाचे अध्यक्ष असतांना त्यांनीं मुलांसाठीं शिष्यवृत्त्या ठेवल्या व पुढें ते पुणें नगरपालिकेचे अध्यक्षहि झाले. नूतन मराठी विद्यालय व न्यू पूना कॉलेज स्थापन करण्यास त्यांचें बरेंच साहाय्य झालें.

सरकार-दरबारीं व युरोपीय लोकांत त्यांचें चांगलें वजन होतें. पण त्याचा दुरुपयोग मात्र ते कधींच करीत नसत. त्यांचा स्वभाव कमालीचा भिडस्त होता. त्यामुळें अमुक एका माणसापासून आपला तोटा आहे हें लक्षांत येऊनहि त्यांना त्या माणसाला तोडून टाकतां येत नसे. त्यांच्या वागण्यांत व्यवस्थितपणा कमी होता व हिशेबी वृत्ति तर नव्हतीच. मित्र, पाहुणे यांच्यासाठीं नेहमींच खर्च चाले. मित्रांच्या मुलांना खेळणीं व खाऊ ते वारंवार देत असत. त्यामुळें लहान मुलांत ते फार प्रिय असत व हरिभाऊंना लहान मुलें आवडत. ताईशीं खेळायला म्हणून बरीच मोठी बालचमू त्यांच्याकडे जमे व ह्या सर्वांसाठीं हरिभाऊ सढळ हातानें खर्च करीत.

बसावयाच्या जागेंत त्यांना वारंवार बदल लागे. निरनिराळ्या प्रकारच्या झरण्या (पेन्स), पेन्सिली, चाकू, मेणबत्त्या, विजेऱ्या (बॅटरीज्) व अशा अनेक चिजा त्यांच्यापाशीं असत. प्रवासाची त्यांना अतिशय आवड असून कॉंग्रेसच्या अधिवेशनाला हजर रहाण्याच्या निमित्तानें त्यांनीं साऱ्या भारतभर प्रवास केला होता. पुस्तकें विकत घेण्यापायीं व त्याचा संग्रह करण्यापायीं त्यांनीं अतोनात पैसा खर्च केला. या त्यांच्या वृत्तीनेंच 'करमणुक' पत्रहि फायदा देऊं शकलें नाहीं.

## असुखी कौटुंबिक जीवन

सर्व दृष्टींनीं यशस्वी ठरलेले हरिभाऊ कौटुंबिक सुखाच्या बाबतींत मात्र दुर्दैवी ठरले असें म्हटलें पाहिजे. पहिली पत्नी लवकरच गेली. तिला झालेलीं अपत्येंहि वांचलीं नाहींत. दुसरीला झालेल्या अपत्यांतली कांहींशी जगली ती ताई.

ताईवर हरिभाऊंचा फार जीव. ती क्षणमात्र दूर झालेली त्यांना खपत नसे. ताईचे वाटेल ते हट्ट त्यांनीं पुरविले. प्रत्येक पाहुणा ताईसाठीं कांहींतरी खेळणें आणी. ताईहि समंजस होती. लहान वयांत साऱ्यांची विचारपूस करण्याची तिची मनोवृत्ति वाखाणण्यासारखी होती. तिला खूप शिकवावयाची हरिभाऊंची इच्छा होती. पण त्यांची ही लाडकी लेकहि १९१३ च्या फेब्रुवारी महिन्यांत हरिभाऊंना एकटेंच सोडून देवाघरीं निघून गेली.

मग मात्र हरिभाऊंना कांहीं सुचेचना. ताईविना जग व स्वत:चें जीवित याची त्यांना कल्पनाच करवेना. त्यांचें चित्त अस्थिर झालें. मनावर मलूलता झाकळूं लागली. कशांतच गोडी वाटेना. त्यांनीं गादी, विडा व साखर या तीन गोष्टी वर्ज्य केल्या.

कालांतरानें त्यांचे वडील नानासाहेब व मित्र ना. गोखले हेहि निवर्तले. त्यामुळें त्यांना आणखीच अस्वस्थ वाटूं लागलें. त्यांतच विरंगुळा म्हणून जोशी नांवाच्या एका इसमाच्या साहाय्यानें त्यांनीं एका कंत्राटामध्यें पैसे गुंतविले. या कामासाठीं पैसे उभे करावे म्हणून ते खूप हिंडले. पण या व्यवहारांत त्यांना नुकसान आलें आणि त्यांचा धीर खचला. १९१७ मध्यें 'करमणूक' पत्र बंद करावें लागलें.

१९१९ मार्चमध्यें त्यांना ज़लोदर झाल्याचा संशय आल्यानें ते मुंबईस डॉक्टरला प्रकृति दाखविण्यास गेले. तेथून दुखण्याला उतार पडेना म्हणून पुण्यास परत येण्यास निघाले व पुण्याला आल्यावर त्याच दिवशीं म्हणजे दि. ३ मार्च १९१९ रोजीं हा असामान्य मराठी कादंबरीकार या नश्वर जगाचा निरोप घेऊन आपल्या लाडक्या ताईला भेटायला निघून गेला.

## कर्मयोगी हरिभाऊ

अवघ्या पंचावन्न वर्षांतल्या आयुष्याचा हा सारा इतिहास. हरिभाऊंच्या वेळचे सामाजिक प्रश्न आज जवळ जवळ पूर्णतया सुटलेले आहेत. एवढा बदल गेल्या पाऊणशें वर्षांत

झाला आहे. 'स्त्रीशिक्षण आतां पुरे' असें म्हणण्याइतकें पुढें गेलें आहे. पांढरपेशा समाजांत मुलगी मॅट्रिक असणें ही तिला नाक डोळे असण्याइतकीच साधी बाब झाली आहे. विवाहाचें वय जरुरीपेक्षां वाढलें आहे. पुनर्विवाह, प्रीतिविवाह हे सारे प्रश्न केव्हांच इतिहासजमा झाले आहेत.

हरिभाऊंच्या काळांत पायांत न घालतां पतिबरोबर बाहेर जायला भिणारी व वडील माणसांदेखत पतीकडे वर नजर करूनहि न पहाणारी स्त्री, आज गर्दीतून पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून चालते आहे. अनेक पदव्या संपादन करून प्राध्यापिका, लेखिका, संपादिका हीं पदें भूषवीत आहे. आगगाडी सोडाच, विमानानें एकटी प्रवास करते आहे. चित्रपटसृष्टींत वावरते आहे. पॅण्ट, शर्ट घालून व टेनिस-रॅकेट घेऊन रस्त्यांतून सायकल वा मोटर चालवीत निःशंक मनानें वावरते आहे. रंगभूमीवर अभिनय करते आहे आणि नोकरी संभाळून मुलें व पति यांना सुखवीत आहे.

या दृश्याला अर्थात् काळी बाजू आहेच; आणि हरिभाऊ पुन्हा जन्माला येऊन ती पहातील तर 'हेंचि फल काय मम तपाला' असें त्यांना म्हणावेंसें वाटेल. पण वरील दृश्याची चांगली बाजूहि बरीच उजळ आहे. आजची स्त्री गेल्या पिढीपेक्षां सुखी आहे, याचें कारण हरिभाऊंसारख्या वाङमयसेवकांचे तळमळीचे प्रयत्न.

तेव्हां हरिभाऊंच्या वेळचे सामाजिक प्रश्न संपले असले व त्या दृष्टीनें त्यांचें मूल्य कांहींसें कमी झालें

असलें तरी उच्च दर्जाच्या ललितकृति म्हणून आजहि त्या वाचाव्याशा वाटतात. आपल्या जन्माच्याहि किती तरी आधींच्या काळांतील पुण्याशीं, त्यांतील पेठांशीं, त्यांतल्या जुनाट घरांशीं, तिथल्या जिवंत अशा सुष्टदुष्ट स्त्री-पुरुषांशीं त्या आपली ओळख करून देतात. एका जुन्या वातावरणांत आपल्या मनाचा चेंडू खेळूं लागतो आणि आपण आसपासचें जग विसरतों. आज ज्या गोष्टी केल्या तर कुणी साधें लक्ष सुद्धां देणार नाहीं अशा आतांच्या दृष्टीनें साध्या पण त्या वेळच्या दृष्टीनें मनाला पेचांत टाकणाऱ्या घटनांत वावरणारीं तीं तीं पात्रें आपलें चित्त वेधून घेतात. ही हरिभाऊंच्या ठिकाणीं असलेली लेखन-शक्ति काय सामान्य म्हणायची ?

कॉलेजच्या शिक्षणांतील अपयशाला वा कौटुंबिक आपत्तींना न घाबरतां ज्यांनीं वाङ्मयावर त्यांतल्या त्यांत कादंबरीसारख्या त्या काळीं उपेक्षित मानल्या गेलेल्या वाङ्मयप्रकारावर एखाद्या साधकाप्रमाणें अचल दृष्टि ठेवली, वाचन-लेखनाचा व्यासंग कर्मयोग्याप्रमाणें आच-रिला, त्या कर्मयोगी हरिभाऊंच्या स्मृतीस सादर अभिवादन.

* * *

म. सं. सं. ठाणें, ... शाखा.
... विभाग
का. क्र. २२५४ दि. २०।५।६७
विषय बा. वा.
BVBK-0401254
BVBK-0401254

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्धयर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमानमहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमॉ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.